नवप्रभा

बुधवार दि. २४ सप्टेंबर २०१४

# हळबे कॉलेजतर्फे मदतनिधी

दोडामार्ग (न. वा.)

नवनिर्माण शिक्षण संस्था रत्नागिरी संचलित, लक्ष्मीबाई हळबे महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने जमा करण्यात आलेला रु. १५ हजाराचा निधी दोडामार्गचे तहसीलदार संतोष जाधव यांच्याकडे माळीण आपदग्रस्तांसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील यांच्याहस्ते सपूर्द करण्यात आला. महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या स्वयंसेवकांनी व प्राध्यापकांनी दि. १४ सप्टेंबर रोजी दोडामार्ग बाजारपेठेत पुणे जिल्ह्यातील माळीण गावच्या आपदग्रस्तांसाठी मदत फेरीचे आयोजन केले होते. या फेरीस दोडामार्गातील व्यापारी, फिरते विक्रेते व नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या फेरीत जमा झालेला रु. १५.०२८ रक्कमेचा धनादेश दि. १९ सप्टेंबर रोजी तहसीलदार संतोष जाधव यांच्याकडे मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी देण्यात आला. यावेळी प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील यांच्यासमवेत विभागाचे कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. एस. यु. दरेकर, प्रा. एस. एन. जाधव, विद्यार्थी प्रतिनिधी अनिल गावडे, ममता गायचोर व भूषण सावंत उपस्थित होते. महाविद्यालयाने सामाजिक उपक्रम राबविल्याबद्दल तहसिलदार जाधव यानी समाधान व्यक्त केले.